# ज्ञान प्रबोधिनी

# स्त्री-शक्ती प्रबोधन

(ग्रामीण)

# वार्षिक वृत्त

राष्ट्रीय शके १९४६-४७

(सन २०२४-२५)
















नवदिशा नेतृत्व प्रकल्प बैठक



डॉ. सुभाष पुराणिक यांची शिवापूर महिला प्रशिक्षण केंद्राला भेट



आरोग्य सखी प्रकल्प डोळे तपासणी



खेळते भांडवल प्रकल्पातून शेळी पालन



आरोग्य सखी प्रकल्प बाल आरोग्य तपासणी




आरोग्य सखी प्रकल्प दात तपासणी



एकल महिलांना मदत मिळवून देताना

# ज्ञान प्रबोधिनी : स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण)

## वार्षिक वृत्त

**राष्ट्रीय सौर शके १९४६-४७ (सन २०२४-२५)**

**(१ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५)**

## मनोगत

नमस्कार,

हे वृत्त २४-२५ या आर्थिक वर्षाचे आहे. हे त्रिदशकपूर्ती वर्ष होते! दैनंदिन कामे सांभाळून भरगच्च कार्यक्रमांनी भरून गेलेले हे वर्ष ! गेली ३० वर्षं स्थानिक महिला शक्तीचा विकास करताना कामाला लागणारे सर्व मनुष्यबळ स्थानिकच उभे करायचे असा आग्रह धरला .... एखादा प्रकल्प, अन्य कोणीतरी ठरवला आहे आणि तो पूर्ण करायचा, असा हेतू कधीच नव्हता; तर जिच्यासाठी करायचा 'ती' ला पचेल, पटेल अशा गतीने करायचा. एवढेच नाही तर 'ती' ला गुंतवून घेत करायचा असा हेतू होता. एकदा का तिला पटले हे ग्रामीण बाईच्या भल्यासाठी आहे की मग 'ती'च त्या कल्पनेची प्रवक्ती झाली पाहिजे! असे झाले की 'ती'चे भावविश्व बदलून जाते... रोजच्या कामाच्या रामरगाड्यात गुरफटून न जाता काहीतरी 'सापडले' आहे असे वाटून ती त्या कल्पनेचा प्रचार करू लागते, त्यासाठी काम करू लागते. त्यातून काहीतरी केल्याच्या आनंदात काम करते. मग मात्र प्रकल्प हे निमित्तमात्र होते.

अशा अनेक जणी या वर्षी 'बाहेर' पडल्या. स्वातीसारखे कोणी स्वयंरोजगारातली शिवणकला शिकवायला तर कोणी उर्मिला, राजश्री स्वयंरोजगाराने उत्पादित केलेला माल कसा विकायचा ही विक्रीकला शिकवायला! कोणी कीर्ती, श्यामल नवमातांना हिरकणी प्रशिक्षण द्यायला, कोणी वैशाली आधुनिक चुलीचा वापर करा असे सांगायला; तर कोणी राणी, उज्ज्वला आरोग्याचा सांगावा द्यायला! दुर्गम गावातल्या युवतींना घराबाहेर काढून अगदी गावातल्या गावातच खेळाच्या निमित्ताने बाल गट गोळा करायला मंगलने शिकवलं. अशा बाहेर पडणाऱ्यांसाठी आशाताई, भारतीताई, तृप्तीताई मार्गदर्शनाला होत्याच, पण थेट संवाद नवीन गटाने केला.

उपेक्षित गटापर्यंत पोहोचून त्यांना सोबत घेऊन प्रतिभाने कातकरी विकासाचा विडा उचलला; तर दुर्गम भागातल्या मुलींच्या शिक्षणासाठी रंजिता कटिबद्ध झाली. अश्विनीने युवतींना लग्नापूर्वीचं नेतृत्व करायचं धाडस दिलं तर कुंदाने सारी व्यवस्थापकीय भोजन - घडी सांभाळली.

हा सगळा गाडा सुरळीत चालायला २.३३ कोटी २४ प्रकल्पांच्या निमित्ताने उभे राहिले. यात जिने-जिने जबाबदारी घेतली त्या प्रत्येकीने स्वतः स्वीकारलेले काम चोख केले आणि त्यातून प्रत्येकीला 'केल्याचा' आनंद मिळाला ही जमेची बाजू!

सुवर्णा गोखले, विभागप्रमुख

- कामाचे समन्वय करण्यासाठी दरमहा ३६ बैठका होतात. हे काम या वर्षी ५००० महिलांपर्यंत पोहोचले असून बैठका + सदस्या + सहभागी त्यासाठी १३४ महिला कार्यकर्त्या काम करीत आहेत.


**◆ ज्ञान प्रबोधिनी संस्थेचे पदाधिकारी ◆**

| | | | |
|---|---|---|---|
| **अध्यक्ष** | **उपाध्यक्ष** | **कार्याध्यक्ष** | **संचालक** |
| डॉ. रघुनाथ माशेलकर | डॉ. विजय केळकर | डॉ. श. बा./रवि पंडित | डॉ. गिरीश श्री. बापट |
| **कार्यवाह** | **सहकार्यवाह** | **निधिधारक** | **संपदाधिकारी** |
| श्री. महेंद्र सेठिया | श्री. आशुतोष बारमुख | श्री. मोहन गुजराथी | श्री. सचिन गाडगीळ |

**स्त्री-शक्ती प्रबोधन कार्यदिशा, सचिव** - प्रा. गौरी कापरे

## ❀ देणगीदार
**१ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५**

- **रु. ५००० /–** पर्यंत ९ जणांनी देणगी दिली.
- **रु. ५,०००/– ते रु. १०,०००/–**
  १) अमोल सांदे   २) सौरभ पटवर्धन   ३) शामल गांधी   ४) विभावरी परांजपे
- **रु. १०,०००/– ते २०,०००/–**
  १) रेखा लेले   २) पूना साऊथ रोटरी चॅरिटेबल ट्रस्ट   ३) सुचेता मैनकर
  ४) पुणे पर्वती रोटरी चॅरिटेबल ट्रस्ट   ५) बी. ए. गोंधळेकर   ६) शुभदा आलेकर
  ७) भूषण करंदीकर   ८) संज्योत घाटपांडे   ९) शुभांगी राव
  १०) डॉ. राधा संगमनेरकर १५,०००/–   ११) रश्मी गोखले १८,०००/–   १४) अपर्णा मांडके २०,०००/–
  १२) धनंजय कुलकर्णी २०,०००/–   १३) विनायक खांदवे २०,०००/–
- **रु. २१,०००/– ते ४०,०००/–**
  १) मिलिंद दर्प २१,०००/–   २) ब्रह्मे सन्स प्रा. लि. २५,०००/–   ३) अनिता चंकेश्वरा २५,०००/–
  ४) स्मिता खरे ३०,०००/–   ५) सोनाली जयस्वाल ३५,०००/–   ६) रसिका गुप्ता ४०,०००/–
- **रु. ५०,०००/– ते रु. १ लक्ष**
  १) रविंद्र आपटे ५०,०००/–   २) जितेंद्र पैठणकर ६०,०००/–   ३) द रोटरी क्लब ऑफ पुणे ६२,५००/–
  ४) पूर्वा मावळे ७०,०००/–   ५) अपूर्वा प्रभुदेसाई ७०,०००/–   ६) मैत्रेया चॅरिटेबल सोसायटी ७५,०००/–
  ७) खुशबू चॅरिटेबल ट्रस्ट ९७,५००/–   ८) हेमलता काळे १,००,०००/–
  ९) राजेंद्र घाणेकर १,००,०००/–   १०) सुलभा कुलकर्णी १,००,०००/–
- **रु. १ लक्ष पेक्षा जास्त**
  १) प्रफुल्ल कुलकर्णी १,१०,०००/–
  २) हेल्थएज टेक्नॉलॉजी इंडिया प्रा. ली. १,१०,०००/–
  ३) रमेश करंदीकर २,००,०००/–
  ४) शोगिनी टेक्नोआर्ट प्रा. लि. ३,००,०००/–
  ५) गायत्री सेवक ३,५०,०००/–
  ६) बोस्टन सायंटिफिक टेक्नॉलॉजी इंजि. सर्विसेस प्रा. लि. ७,१७,५००/–
  ७) सायबेज आशा ट्रस्ट १३,८५,६००/–
  ८) एन.जी. परांजपे प्रतिष्ठान १७,८५,०००/–
  ९) ग्लोबंट इंडिया प्रा.लि. ४८,००,०००/–
  १०) कोफोर्ज बिझनेस सोल्यूशन प्रा. लि. ४७,००,०००/–

**❊ वरील देणगीतून २०२४-२५ या वर्षात खालील प्रकल्प राबवले गेले. ❊**

- **स्वयंरोजगाराशी संबंधित** – धनश्री, संपदा, हरित ऊर्जा शेती प्रकल्प
- **पर्यावरणाशी संबंधित** – स्वाधार
- **आरोग्याशी संबंधित** – आरोग्य सखी
- **अन्य** – खेळते भांडवल अर्थसखी नवरात्र मेळावे, युवोन्नती
- **उपेक्षित समाजासंबंधित** – जास्वंद गिरीकन्या निवास बालवाडी, एकल महिला कातकरी विकास प्रकल्प

**★ वर्षभर छोटे–मोठे मिळून २८ प्रकल्प सुरू होते. ★**

**ज्ञान प्रबोधिनीला दिलेल्या देणग्या आयकर कायद्याच्या परि. ८० (जी) खाली करमुक्त आहेत.**

**'ज्ञान प्रबोधिनी' या नावाने धनादेश काढावा**

संपर्क : ज्ञान प्रबोधिनी : स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण),
५१० सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० दूरभाष : (०२०) २४२०७१६२/१३३
★ शिवापूर : खेड–शिवापूर वाडा, ता. हवेली, जि. पुणे ४१२ २०५, ★ नसरापूर : ता. भोर, जि. पुणे
★ करंजावणे : मातृछाया, ता. वेल्हे, जिल्हा पुणे ★ वेल्हे : पोलिस स्टेशन जवळ, ता. वेल्हे, जिल्हा पुणे

## ❀ त्रिदशकपूर्ती

एप्रिल १९९५ मध्ये शिवापूर गावामध्ये पहिला ग्रामीण महिलांचा जिजामाता बचत गट सुरू झाला. या उपक्रमाने ग्रामीण महिलांच्या आर्थिक स्वयंपूर्णतेसाठीच्या कामाला सुरुवात झाली. हे या कामाचे त्रिदशकपूर्तीचे वर्ष!

या निमित्ताने वर्षभरात काही विशेष कार्यक्रम करण्याचे ठरवले. यात जबाबदारी घेऊन काम करणाऱ्या गटाने प्रतिज्ञा ग्रहण कार्यक्रम करायचा; ज्यामध्ये गट स्वयंस्फूर्तीने काम करत आहे हे सगळ्यांना कळेल असा एक कार्यक्रम. ज्यांच्यासाठी काम चालू आहे अशा प्रत्यक्ष कामात सहभागी होणाऱ्या सगळ्यांनी मिळून जे-जे काम चालते त्याविषयीचे प्रात्यक्षिक सादर करणे असा दुसरा कार्यक्रम आणि ३० वर्षांच्या कामाच्या अनुभवातून, कुठेही घेऊन जाता येतील असे आम्हाला सापडलेले उपक्रम, जे प्रशिक्षणानंतर स्थानिक मनुष्यशक्ती घेऊ शकेल अशा पाच उपक्रमांचे सादरीकरण 'आत्मसन्मानाची परिषद' घेऊन केले.

### ★ ३० वर्षांच्या कामाचे निवेदन व प्रतिज्ञाग्रहण :

➢ **स्त्री-शक्ती ग्रामीण त्रिदशकपूर्ती कामाचा आढावा घेणारे निवेदन** प्रतिज्ञाग्रहण कार्यक्रमासोबत वेल्हे, तांबे संकुल येथील कार्यक्रमात केले. कामाचे निवेदन पॉवर पॉईंटच्या स्लाईड्स द्वारे सादरीकरण करून त्या-त्या विषयात जास्तीत जास्त काळ काम करणाऱ्या ताईने केले. दुपारच्या सत्रात प्रतिज्ञाग्रहण कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाची पूर्वतयारी म्हणून ज्ञान प्रबोधिनीची प्रतिज्ञा का घ्यावीशी वाटते त्याचे मनोगत सांगणारी बैठक मा. सुभाषरावांच्या उपस्थितीत झाली. मग प्रत्येकीने संचालकांना लेखी मनोगत दिले व कार्यक्रमात प्रत्यक्ष प्रतिज्ञा घेतली. देशसेवेचे व्रत घेणारी प्रथम प्रतिज्ञा १५ जणींनी, प्रबोधिनी या माध्यमातून राष्ट्रसेवा करण्याचे व्रत घेणारी द्वितीय प्रतिज्ञा १३ जणींनी तर पूर्णवेळ कामाचा प्रगत संकल्प करणारी तृतीय प्रतिज्ञा दोन जणींनी घेतली.

➢ **३० सदस्यांचा प्रतिज्ञाग्रहण कार्यक्रम** उत्साहात पार पडला. आदरणीय सुभाषराव यांनी तिन्ही गटातील सदस्यांना प्रतिज्ञा दिल्या आणि आपले शब्दरूपी शुभ आशीर्वाद दिले. माननीय कार्यवाह महेंद्रभाई कार्यक्रमाला उपस्थित होते. त्यांचे उपस्थित गटाला प्रेरणादायक मार्गदर्शन झाले. प्रतिज्ञा घेणाऱ्या काही महिला कार्यकर्त्यांच्या कुटुंबातील सदस्य आणि या पूर्वी प्रतिज्ञा घेतलेल्या १२ जणी या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. असा हा प्रतिज्ञाग्रहणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

### ★ क्रीडा प्रात्याक्षिके :

त्रिदशकपूर्ती निमित्ताने जिजाऊ जयंतीच्या दिवशी म्हणजे १२ जानेवारीला वेल्हे येथे प्रात्यक्षिकांचे आयोजन केले होते. यामध्ये २३ गावांतील (६६ किमी परिसरातील), ७ गटांतील, २३४ जणींनी १६ प्रकार वेल्ह्यातील तोरणा विद्यालयाच्या स्टेजवर सादर केले. यात सगळ्यात गेळगण्याच्या आपल्या बालवाडीतील ६ वर्षांची मुलगी लहान होती तर सगळ्यात मोठी घिसर गावातील ताई ६७ वर्षांची. प्रात्यक्षिकांमध्ये बालवाडीतील मुलांनी तोल सांभाळण्यासाठी चमचा लिंबू, तर घिसरच्या ताईने पारंपरिक खेळ सादर केले. डोक्यावर रिकामा हंडा घेऊन चालल्या, उखाणा घेऊन पारंपरिक खेळ सादर केले, जिजाऊंचे गीत, मनोरे- योगासने तर होतीच; सोबत झुंबाही झाला... हिरकणींनी गीतावर नृत्य बसवले होते तर युवतींनी जिजाऊ स्मरणाचे गीत गायले. एवढेच काय पण पार्लर वर्गाने मॉडेल म्हणून जिजाऊ, संक्रांतीसाठी हलव्याच्या दागिन्यांनी सजवलेले मॉडेल त्यांचेही प्रात्यक्षिक सादर केले. कर्ता नवीन गट सादरीकरणातून खूप काही शिकला!! या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ज्ञान प्रबोधिनीच्या हराळी केंद्राचे प्रमुख मा. अभिजितदादा कापरे उपस्थित होते. प्रात्यक्षिक कशासाठी? तर एकत्र येऊन सगळ्यांनी एकसारखी समान कृती करत आपल्यातील एकीच्या शक्तीचे दर्शन सर्वांना घडवणे असे सोप्या शब्दातील प्रेरणादायी मार्गदर्शन अभिजितदादांनी सर्वांना केले. मा. सुवर्णाताईंनी कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांना धन्यवाद देत प्रार्थनेने कार्यक्रमाचा समारोप झाला.

**अवश्य ऐका** : विकास यात्रा या कार्यक्रमांतर्गत आकाशवाणी पुणे आणि ज्ञान प्रबोधिनी स्त्री-शक्ती प्रबोधन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या 'करूया मात ॲनिमियावर' या विषयावरील परिसंवादाचा ध्वनिमुद्रित संपादित अंश. आकाशवाणीतून गौरीताई, नीलिमाताई आल्या आणि हा कार्यक्रम वेल्ह्यात झाला! नक्की ऐका...

**तज्ज्ञ सहभाग** - डॉ. शिवाजी कुरंकार, तृप्ती कुलकर्णी आणि सुवर्णा गोखले, **सूत्रसंचालन** - गौरी लागू

सादरकर्त्या - नीलिमा पटवर्धन #VikasYatra#AkashvaniPune https://youtu.be/4Rq24JHh9do

### ★ आत्मसन्मानाची गोष्ट परिषद २०२५

ग्रामीण महिलेची स्त्री-शक्ती प्रबोधनाची प्रक्रिया जलद गतीने होण्यासाठी गेली अनेक वर्षं आपण आपल्या भागात गाव पातळीवर मेळावे, स्वयंरोजगार, सहली, अभ्यासदौरे व हिरकणी असे पाच उपक्रम घेत आहोत. या उपक्रमांतील सहभागामुळे ग्रामीण बाईचे आयुष्य आमूलाग्र बदलते असे लक्षात आले. असे ज्यांच्या बाबतीत घडले त्या महिला अनुभवकथन करायला स्टेजवर बसल्या होत्या. त्यांचे चित्रीकरण दाखवून त्यांनी अनुभवकथन केले. हा कार्यक्रम बिज पब्लिकेशनच्या सहयोगाने केला. सर्व प्रक्रियेचे दस्तऐवजीकरण बिज पब्लिकेशनने केले. त्यावर आत्मसन्मानाची गोष्ट असे एक छोटेसे पुस्तक करून त्याचे प्रकाशन बचत गटाच्या आद्य प्रवर्तक डॉ. सुधाताई कोठारी यांच्या हस्ते केले. अन्य संस्थेच्या प्रतिनिधींसह १०८ जणांच्या उपस्थितीत ही परिषद ज्ञान प्रबोधिनी पुणे येथील प्रबोध सभागृहात पार पडली .

या शिवाय अन्य १७ कार्यक्रम त्रिदशकपूर्ती निमित्ताने योजले होते ते खालील प्रमाणे -

| अ. क्र. | कार्यक्रम | पूर्ण झालेल्या कार्यक्रमांची संख्या | अन्य तपशील |
|---|---|---|---|
| १. | प्रतिज्ञाग्रहण कार्यक्रम | | २९ कार्यकर्त्यांनी प्रतिज्ञा घेतली |
| २. | ज्ञान प्रबोधिनीच्या अन्य केंद्रांना कार्यकर्त्यांच्या भेटी | ६ केंद्र | ६८ कार्यकर्त्यांनी भेट दिली |
| ३. | आंबवणे जागेत वृक्षारोपण | १ कार्यक्रम | ३५० झाडे लावली |
| ४. | सुकाणू गटातील प्रत्येकीने सोबत काम करणाऱ्या कोणातरी कार्यकर्त्यांच्या गृहभेटी घेणे | ३५ जणींच्या घरी गृहभेटी | |
| ५. | एकल महिला मेळावा | २८ जणी | पासली |
| ६. | आजी, आजोबा, ज्येष्ठ नागरिक मेळावा | ८१ आजी-आजोबा | वेल्हे |
| ७. | रानभाज्या विक्री मेळावा | ३३ सहभागी | पासली |
| ८. | **आत्मसन्मानाची गोष्ट** पुस्तक व परिषद | | |
| ९. | विविध संस्था भेटी | ७ संस्था | २९ कार्यकर्त्यांचा सहभाग |
| १०. | युवतींना वेगवेगळ्या वस्तू विक्रीची संधी देणे | ३० | २१ |
| ११. | गाववार उद्योग प्रशिक्षणे | २५ प्रशिक्षणे | २८६ महिलांना लाभ |
| १२. | परदेशात वस्तू विक्री करणे | एका देशात | १४ प्रकारच्या वस्तू विक्री |
| १३. | करंजावणे विक्री केंद्र सुरू करणे | | |
| १४. | दूरस्थ पद्धतीने विक्री करणे | भाजी विक्री | लाखाची उलाढाल |
| १५. | पंतप्रधान विमा योजनेत सहभागी व्हावे म्हणून काम करणे | ५ जणी | ५ जणांना लाभ |
| १६. | ३० लेख लिहिणे, ३० यशोगाथा रील करणे | एकूण ३० लेख लिहिले | मागे वळून बघताना, १५ यशोगाथा झाल्या |
| १७. | क्रीडा प्रात्यक्षिके | १ | ३०० जणांचा सहभाग |
| १८. | वेल्हे केंद्रावर संस्कार वर्ग सुरू | वेल्हे | १६ मुले |
| १९. | HB तपासणी | १० ठिकाणी | ५४४ जणी |
| २०. | वर्षभरात झालेल्या कार्यक्रमांचे सादरीकरण | | जून मध्ये नियोजित |

२३ यशोगाथांची रील, हरित ऊर्जा शेती प्रकल्प, वेल्ह्यातील जैव विविधतेच्या नोंदी करणारे, जास्वंद गिरीकन्या निवासावरचे असे प्रत्यक्ष कामावरचे ११२ व्हिडीओ या लिंकवर बघायला मिळतील.

## ꕥ आर्थिक स्वावलंबन वाढवणे

◈ **बचत गट :** ६३ गावांतून चालणाऱ्या १२५ गटांमधून रु. १.३२ कोटी बचत तर रु. ४.०१ कोटी अर्थसाहाय्य (कर्ज) दिले गेले. या उपक्रमात १९२० महिलांचा सहभाग होता. रु. ५७.७८ लक्ष रुपयांचे व्याज मिळवले आहे हे विशेष !

| क्र. | विभाग | गट | सभासद | बचत | अर्थसाहाय्य | परतफेड | येणे बाकी | व्याज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | राजगड | ४ | ६२ | २४८५०० | ४१५३६० | २०२९६० | २१२४०० | ९५९२४ |
| २. | नवदिशा | ४ | ७० | ३०४७०० | ६०२००० | २८०३०० | ३२१७०० | २३६२२० |
| ३. | शिवरे | ७ | ११८ | २२८९००० | ५९०६८०४ | ३०५३१४६ | २८५३६५८ | ७६३६४७ |
| ४. | खोपी | ११ | १७३ | ११४७७५० | १०९१२४५० | २११५०३० | ८४१०४२० | ७९२९१० |
| ५. | पारवडी | ९ | १७१ | ६०५७०० | ९०७७२० | २०७८७० | ६९९८५० | १७७०४६ |
| ६. | नव चेतना | १६ | २७८ | १४२६७०० | २२७०००० | ८०५०४० | १४६४९६० | ३६४४९६ |
| ७. | पासली | १३ | १२० | ५९६४५० | १२५४२७९ | ७३५४६१ | ३८४३४९ | १४७५८५ |
| ८. | सांगवी | २० | २९५ | २३७९७६० | १११९२४०० | ४३६८०४१ | ६७४७८२९ | २५३८४९६ |
| ९. | शाश्वत | १३ | २१९ | १३५९७०० | ३९४१२३२ | १६७३८०० | २२६७४३२ | ६३०९०७ |
| १०. | शिवापूर | ९ | १७६ | २७७९६०० | ३९१६१८० | ११५१८२४ | २८२२२५६ | ५१०२०६ |
| ११. | संपदा | २६ | ३४१ | १४७२००० | ४३६२३६० | १०८२४२० | ३२७९९४० | ३६७४६१ |
| १२. | वाजेघर | १ | २० | ६१६०० | ६४००३ | २९०० | ६११०३ | ८८४९ |
| १३. | वेल्हा | ३ | ५७ | ११३५०८४ | ७०७७२९ | ४२७३६२ | १९७९५३ | ४७१२ |
| | **एकूण** | **१३७** | **२१०९** | **१५४५२१६०** | **४७००१६७२** | **१६४०६२२१** | **३००५५३५९** | **६८५७५६८** |

◈ **खेळते भांडवल**

बचत गटातील ज्या महिलांना काहीतरी छोटासा उद्योग करून चार पैसे जोडण्याची आणि जीवनमानात सुधारणा करण्याची इच्छा असते, बँकेतून मागणी करण्याच्या रकमेपेक्षा ही रक्कम लहान असते अशा काही महिलांना ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन (JPF), अमेरिका यांच्या मदतीने गेली पाच वर्षे आपण छोटी कर्जे देत आहोत. ही विशिष्ट कालावधील परतफेड करण्याची कर्जे घेऊन आजवर पाच वर्षांत १९२ महिलांनी, तर या वृत्त काळात ५२ महिलांनी आपले उत्पादन जवळजवळ दुप्पट करून घराला आधार दिला आहे. सर्व महिलांनी वेळेत कर्जफेड केली असून त्यामुळे त्यांचा उत्साह वाढला आहे. शेळीपालन, गुरे, शेती अशा अनेक प्रकारच्या कामांसाठी महिला उत्साहाने पुढे येत आहेत.

आजवर १२ महिलांनी दुबार तर तीन जणींनी तीन वेळा कर्ज घेऊन त्याची परतफेड केली. या वर्षी २४ गावांमधील ३९ महिलांनी एकूण ५,९९,५००/- रुपयांची कर्जे घेतली. आर्थिक उलाढालींच्या मुख्य प्रवाहात महिला आल्याशिवाय त्यांच्या आत्मसन्मानासाठीचे काम पूर्ण होऊ शकणार नाही यासाठी हा उपक्रम खूप महत्त्वाचा ठरला आहे.

◆ **अर्थ–सखी प्रकल्प :** रोटरी क्लब ऑफ गांधी भवन व ज्ञान प्रबोधिनी स्त्री–शक्ती प्रबोधन यांच्या संयुक्त विद्यमाने एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत आर्थिक साक्षरतेवर जाणीव–जागृती कार्यक्रम घेण्यात आले. तसेच अर्थ–सखी प्रकल्पांतर्गत कागदपत्रांची पूर्तता लोकांनी करावी, आर्थिक व्यवहार सुखकर करावेत यासाठी लोकांची प्रत्यक्ष कामे करण्यात आली.

**जाणीव–जागृती** – आधार कार्ड, पॅन कार्ड, बँक खाते, विमा व पीपीएफ खाते, google pay, UPI द्वारे व्यवहार करणे, बँकेतील चेक (cheque) वाचणे या विषयावर ५६६ लोकांची जाणीव–जागृती केली.

अर्थ–सखी प्रकल्प गावात जाऊन घेण्यासाठी पाच प्रशिक्षक प्रशिक्षणे झाली. त्यामध्ये ३२ युवती व महिलांनी सहभाग घेतला. प्रकल्पांतर्गत वेल्हे तालुक्यातील दुर्गम गावांमध्ये जाऊन जाणीव–जागृती व प्रत्यक्ष कामे करण्याचे नियोजन केले गेले. शासनाच्या वतीने गावागावांतून अनिवार्य केलेले साक्षरतेचे मुद्दे सोडून अन्य मुद्यांवर काम करण्याचे ठरले. यात आधार कार्ड काढणे, पॅन कार्ड काढणे, बँक खाती काढणे अशी एकूण १८२ कामे झाली.

# ꕥ स्वयंरोजगार

★ **स्वयंरोजगार :**

◈ **हरित ऊर्जा शेती प्रकल्प :** ग्लोबंट इंडिया या कंपनीच्या आर्थिक सहकार्याने सुरू झालेल्या या प्रकल्पाचे हे शेवटचे म्हणजेच तिसरे वर्ष. ४४ एकर ऊर्जा शेती म्हणून हत्ती गवताची लागवड केली आहे. त्याची कापणी, कुट्टी करणे, उत्पादनाच्या ठिकाणी आणणे व प्रत्यक्ष उत्पादन करणे असे या पथदर्शी प्रकल्पाचे काम, हरित ऊर्जा महिला बचत गटाने पाहिले. तीन मोठी यंत्र चालण्यासाठी लागणारे वीज कनेक्शन घेणे हे जिकिरीचे काम होते. या वर्षी वीज येईपर्यंत जनरेटर आणून नंतर वीज पुरवठा सुरळीत सुरू झाल्यावर उत्पादन सुरू झाले. पाऊस जास्त काळ पडला. पाऊस पूर्ण थांबल्यावर पुढच्या चार महिन्यांच्या कालावधीमध्ये महिलांनी २० टन इंधनकांडीचे उत्पादन केले. या पथदर्शी प्रकल्पाला २२ गावांतील प्रतिनिधींनी भेट दिली. शासकीय व बँकेच्या नऊ अधिकाऱ्यांनी भेट दिली. मेळघाट मित्र, धाराशिव, मुंबई, निगडी, पुणे अशा ठिकाणांहून आठ गटांत ९० हून जास्त जणांनी भेट दिली. अरुणाचल राज्यातून आलेल्या विजयजी स्वामी यांच्या सोबतचा गट व राजस्थानहून आलेल्या मधूताई शर्मा हे विशेष पाहुणे उत्पादन प्रक्रिया बघून गेले. हत्ती गवतामध्ये इंधनकांडी चांगली व्हावी म्हणून पाचोळ्याचे मिश्रण केले तर चांगले होईल म्हणून पुण्यातून साधारण आठ टन पाचोळा विविध सोसायट्यांच्या व्यवस्थापकांच्या मदतीने गोळा केला.

◈ **धनश्री प्रकल्प :** ग्रामीण महिलांना कौशल्य प्रशिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभे करणे यासाठी ज्ञान प्रबोधिनी फौंडेशनच्या आर्थिक मदतीने या वर्षी धनश्री प्रकल्प शिवापूर, नसरापूर व वेल्हे या तीन केंद्रांतून राबवला गेला. शिवापूर येथे ११ जणींसाठी पार्लर वर्ग सुरू केला व त्यातल्या ज्यांना पार्लर सुरू करायचे होते अशा आठ जणींना रु. १०,०००/- आर्थिक साहाय्य सुद्धा दिले. वर्षभरात भरतकाम, वेगवेगळ्या प्रकारचे शिवण शिकवणारे वर्ग, उन्हाळी वाळवणे, साबण, मेणबत्ती, क्विलिंग दिवे असे २३ प्रकारचे वर्ग झाले, ज्यांमध्ये २४२ जणींनी प्रशिक्षण घेतले.

◈ **पुणे केंद्र :** ग्रामीण भागातील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तूंच्या विक्रीला हातभार लावण्यासाठी आपण पुण्यातील ज्ञान प्रबोधिनीमध्ये विक्रीची व्यवस्था करून मदत करीत आहोत. वृत्त काळात शिवापूर, नसरापूर, आंबवणे, वेल्हे, पासली या ज्ञान प्रबोधिनीच्या केंद्रांमधून वर्षभरात रु. ५,६०,९१२/- ची उलाढाल झाली. या वर्षी कातकरी समाजातील सात जणांनी जांभळे तोडून त्याची विक्री केली. या वेगळ्या अशा उपक्रमात ९७,०००/- रु. उलाढाल झाली.

◈ **सायबेज संपदा :** सायबेज कंपनीच्या आर्थिक साहाय्यातून ग्रामीण भागात महिलांच्या उपजीविकेवर परिणाम करणारे काम इतके चांगल्या प्रकारे झाले की मागील वर्षी वेल्हे तालुक्यातील नऊ गावांत चाललेल्या या प्रकल्पात भोर मधील सहा गावांचा सहभाग होऊन आता १५ गावे सहभागी आहेत. ग्रामीण भागातील शेतकरी महिलांचे उत्पादन वाढवणे आणि त्यायोगे त्यांचे जीवनमान सुधारणे हा याचा मूळ हेतू. त्यासाठी सहभागी महिलांचे बचत गट करणे, बचत गटांना खेळते भांडवल उपलब्ध करून देणे, महिलांना वेगवेगळ्या प्रकारची प्रशिक्षणे देणे, त्या प्रशिक्षणातून त्यांना उत्पादने करण्यास प्रेरणा देणे, उत्पादनांची विक्री विविध stalls च्या मदतीने त्यांनी करावी हे पाहणे. या अंतर्गत २६ बचत गट आहेत. एकूण ३७ प्रशिक्षणांतून २६७ जणींनी सहभाग घेऊन उत्पादने, पॅकिंग, कॉस्टिंग, विक्री, हिशोब, गिऱ्हाईकांची काळजी असे अनेक विषय त्या शिकल्या. २७ जणींना ७,२८,०००/- रुपयांचे खेळते भांडवल देण्यात आले. मागील वर्षी ९ लक्ष रुपयांच्या खेळत्या भांडवलातून १६ लक्ष रुपयांची उलाढाल महिलांनी केली तर या वर्षी ही उलाढाल २५ लक्षांपर्यंत झाली. ६२ महिलांचे उत्पादन मासिक १०,०००/- रुपयांपर्यंत आले. तर १० जणींची वार्षिक उलाढाल ३ ते ३.५० लक्ष झाली. ५१ महिलांनी पाच अभ्यास सहलींमधून आपल्या उत्पादन वाढीच्या या चालू कामाला प्रेरणा मिळवली आहे. या वर्षी ७० महिलांनी मिळून ७,५०,०००/- रुपयांचे उत्पादन केले आहे आणि ४९ stalls मधून ८,१७,०००/- रुपयांची विक्री झाली आहे.

★ **स्वाधार प्रकल्प**

गेल्या तीन वर्षांपासून मावळातील नऊ गावांमध्ये स्वाधार प्रकल्प चालू आहे. गावकऱ्यांना उपजीविकेसाठी प्रशिक्षण देणे, महिलांचे बचत गट तयार करणे व त्यांना कौशल्य प्रशिक्षण देऊन त्यांचे उत्पादन वाढवणे हे काम चालते. सध्या नऊ गावांमध्ये मिळून १३ गट आणि १७४ महिला सभासद आहेत. ११ कौशल्य प्रशिक्षणे झाली. देवराई सहलीच्या माध्यमातून ३३६ लोकांच्या जेवण व नाष्टा व्यवस्था स्थानिक महिलांनी केल्या व त्यातून ८२,६७०/- रुपये एवढी उलाढाल झाली.

➢ **अभ्याससहली :** छोटा उद्योग सुरू करण्याची इच्छा असणाऱ्या आठ जणी शिवापूर मधील महिलांचे गृह उद्योग, न्यू विलास हॉटेल मधील बचत गटाचा स्टॉल आणि रविवार पेठेतील होलसेलची दुकाने पाहून आल्या.

➢ **माजगाव येथील पशुखाद्य उत्पादन :** peleting मशीन चा वापर करून पशुखाद्य बनवण्यास सुरुवात झाली. आजपर्यंत १ टन पशुखाद्य बनले आणि शेळीपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना विकण्यात आले.

➢ **जैव विविधता, औषधी वनस्पती लागवड :** जैवविविधता या विषयांतर्गत करंजावणे येथे कोफोर्ज कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या साहाय्याने सप्टेंबर महिन्यात ७३ प्रकारच्या ४०० औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली. तसेच करंजावणे येथे वेल्हे भागातील औषधी वनस्पतींची नर्सरी तयार करण्यात आली आहे. यासाठी कोफोर्ज कंपनीचे ४८ स्वयंसेवक व ज्ञान प्रबोधिनीचे १७ कार्यकर्ते अशा ६५ जणांनी वृक्षारोपण केले.

➢ **चुली व इंधन वाटप :** माजगाव, पासली आणि जाधववाडी या तीन गावांमध्ये १५ चुलींचे वाटप केले आहे. लोकांच्या मागणीनुसार इंधन वाटप करण्याचे काम चालू आहे. लाकूडतोड आणि महिलांचे कष्ट वाचावे असा दुहेरी हेतू आहे.

➢ **फोटो स्पर्धा :** वेल्हे तालुक्यातील गावांमध्ये लोक सहभागातून जैवविविधतेचे फोटो संकलन करणे व त्याची नोंद राहावी यासाठी फोटो स्पर्धेचे १० नोव्हेंबर ते २२ डिसेंबर या कालावधीमध्ये आवाहन केले होते. त्यामध्ये एकूण १९० फोटोंचे संकलन करण्यात आले व त्यावर आधारित २४ पानांची पुस्तिका तयार करण्यात आली.

➢ कमवा आणि शिका मधील युवतींनी **एकल महिला सर्वेक्षण** – १५ गावांतील ६२ महिलांचे, बाल आरोग्य सर्वेक्षण – १० गावांतील ३५ मुले, चुलींचे सर्वेक्षण – सहा गावांमध्ये मिळून २९ चुली. स्टॉकची यादी, ग्रंथालय हलवणे, इमारतीची स्वच्छता, खाद्यपदार्थ बनवणे : पापड, सांडगे, मुरंबा, करवंद जाम, इ.

◈ **अन्नपूर्णा :** रोटरी क्लब ऑफ पुणे, गांधीभवनच्या आर्थिक मदतीने वाजेघर भागातल्या सहा गावांत पाच उत्पादक कौशल्य प्रशिक्षणे झाली, त्यात ४५ महिला सहभागी होत्या. त्यांनी बनवलेले खाद्य पदार्थ कमलिनी कुटीर येथे विकायचे गटाचे प्रशिक्षणही झाले.

जैवविविधतेवर आधारित १६ क्लिप्स बनवून अठरा गाव मावळ या यू ट्यूब चॅनलवर अपलोड केल्या आहेत.

## आरोग्य

स्थानिक कार्यकर्त्यांच्या पुढाकाराने व आशा कार्यकर्त्यांच्या मदतीने गेली ३० वर्षे सातत्याने आरोग्याचे काम चालू आहे. विविध प्रकल्पाच्या रचनेतून हे काम चालते.

◈ **आरोग्य सखी प्रकल्प**

स्त्री-शक्ती प्रबोधन, ग्रामीण मार्फत ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन, अमेरिका आणि बोस्टन सायंटिफिक यांच्या मदतीने दोन्हीचे वेगवेगळ्या गावात स्वतंत्रपणे वेगवेगळे आरोग्याचे उपक्रम केले जातात. यात मुख्यतः विविध तपासण्या आणि जाणीव-जागृती सत्रे असतात. यात पुढील प्रमाणे कामे झाली :-

◆ **बाल आरोग्य तपासणी :-** ६८ गावांतून २८४ मुलांची तपासणी झाली. जानेवारी महिन्यात पाठपुरावा शिबिर होते त्याला एकूण ५२ मुले पाठपुराव्यासाठी आली होती.

◆ **गरोदर माता :-** पाटणकर ट्रस्टच्या माध्यमातून गेली १८ वर्षे वेल्हे तालुक्यात गरोदर माता तपासणी व सुरक्षित बाळंतपणासाठीचे सर्व प्रयत्न तज्ज्ञ डॉक्टरांकडून केले जातात. वृत्त काळात ५१४ गरोदर मातांची तपासणी झाली. २५ बाळांची तपासणी करण्यात आली आहे.

◆ **डोळे तपासणी :-** JPF अंतर्गत वांगणी, मांगदरी, आंबवणे, लव्ही, गाऊडदरा, गुंजवणी, पसुरे या ७ गावांतून एकूण २१५ लोकांची तपासणी झाली. १३ जणांच्या मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया झाल्या. गावात शस्त्रक्रियेपूर्वीची आरोग्य तपासणी करण्याची व्यवस्था करावी लागेल असा अनुभव आला. बोस्टन मार्फत दोन गावांत शिबिरे होऊन ७५ जणांची तपासणी झाली.

◆ **सकस आहार व सॅनिटरी पॅड सत्र :-** भोर व वेल्हे गावातून सकस आहार व मासिक पाळी संदर्भात सत्रे घेतली. या सत्रांसाठी २७ महिला उपस्थित होत्या. यात सकस आहार व मासिक पाळी, वैयक्तिक स्वच्छता या संदर्भात माहिती दिली. तर बोस्टन अंतर्गत २० गावांत ३०० जणींसाठी जाणीव-जागृती सत्रे घेतली. डॉक्टर मुटगिरकर यांनी मासिक पाळीविषयी माहिती देण्याचे सत्र कसे घ्यायचे याचे प्रशिक्षण २३ जणींना दिले.

| क्र. | कॅम्पची नावे | कॅम्प्स ची संख्या | सहभागी |
|---|---|---|---|
| १. | बाल आरोग्य | १० | २८४ |
| २. | डोळे तपासणी | ११ | २९० |
| ३. | HPV तपासणी | १२ | ९९ |
| ४. | दात तपासणी | ३३ | २६० |
| ५. | गरोदर माता | १० | ४५ |
| ६. | H.B. तपासणी | ८ | ३०४ |
| ७. | नवजात शिशु | ९ | ३० |
| ८. | सकस आहार | १० | १६५ |
| ९. | सॅनिटरी पॅड सत्र | ७ | १०० |
| १०. | जंत निर्मूलन | ७ | १४० |
| | **एकूण** | **११७** | **१७१७** |

◆ **दात तपासणी :–** वर्षभरात ३० तपासणी शिबिरे झाली. डॉ. अनुजाताई महाजन, डॉ. वैदेहीताई केळकर, डॉ. प्रचीतीताई आणि डॉ. सोनलताई सहस्त्रबुद्धे यांनी तपासणी केली. एकूण ३७ गावांतून २४५ रुग्णांची तपासणी करण्यात आली.

◆ **H.B. तपासणी :–** आठ गावांतून आठ तपासणी शिबिरे झाली. आत्तापर्यंत एकूण ३१९ जणांची H.B. तपासणी झाली. ज्यांचे H.B. १०gm पेक्षा कमी आहे त्यांना फोलिक ॲसिडच्या गोळ्या देण्यात आल्या आहेत.

◆ **HPV तपासणी :–** एकूण १२ शिबिरे घेतली. यातून एकूण ९९ महिलांना कर्करोगपूर्व तपासणीचा लाभ झाला. डॉ. शुभांगीताई कानिटकर यांनी जाणीव–जागृतीचे सत्र घेतले आणि तपासणी केली.

◆ **जंत निर्मूलन सत्र :-** पासली भागात आरोग्य सखी प्रकल्पातून सात गावांमध्ये १४० लोकांसाठी जंत निर्मूलन सत्रे घेण्यात आली. ६६ लोकांना जंतगोळ्या वाटप केल्या. तर बोस्टन अंतर्गत २० गावांत २०० जणांसाठी जाणीव–जागृती सत्रे घेतली.

◆ **ज्वाला प्रकल्प :** वेल्हे तालुक्यातील साधारण ५ जण कुटुंब–सदस्य असणाऱ्या एका कुटुंबाला अंघोळीचे पाणी तापवण्यासाठी वर्षाला साडेचार टन लाकूड लागते. तसेच स्वयंपाकासाठी साडेचार टन वेगळे लाकूड लागते. एकूण ९ टन लाकडाची तोड एका कुटुंबासाठी होते. ही पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी आपण ज्वाला या प्रकल्पात गवतापासून बनलेल्या पेलेट ज्या चुलीत इंधन म्हणून चालतील अशा चुली गावकऱ्यांना दिल्या. आणि त्या चुलीत वापरता येईल असे हे इंधनसुद्धा उपलब्ध केले.

### ☆ दोन दशके अव्याहतपणे चाललेला आरोग्य यज्ञ ☆

वेल्हे तालुक्यातल्या महिला या स्वतःच्या आरोग्याच्या प्रश्नांना सर्वात शेवटचे प्राधान्य देणाऱ्या. त्यात हॉस्पिटलमध्ये पुरुष डॉक्टर असतील आणि आरोग्याचा प्रश्न हा महिलेच्या बाळंतपण आणि महिला आरोग्याच्या प्रसूती इ. विषयांशी संबंधित असेल तर दवाखान्याची पायरी चढण्याचा प्रश्नच येत नाही अशी मानसिकता! हे प्रश्न जाणून पुण्यातील 'पाटणकर नर्सिंग होम' आणि 'पाटणकर ट्रस्ट' यांनी अव्याहतपणे साधारण दोन दशके वेल्हे तालुक्यात आरोग्याचा यज्ञ चालू ठेवला.

- सुरक्षित मातृत्व आणि सुरक्षित प्रसूती या विषयासाठी डॉ. वैशाली बिनीवाले आणि डॉ. तनुश्री या आपल्या माजी विद्यार्थिनींनी काम सुरू केले. सोबत ट्रस्टच्या डॉक्टर, परिचारिका तंत्रज्ञ आणि साहाय्यक अशा गटाने दरमहा आरोग्य शिबिर घेऊन गरोदर महिला तपासणी, तिला लागणारी सर्व औषधे व जीवनसत्त्वे विनामूल्य दिली. ९ महिने भावी मातेची तपासणी व काळजी घेतली. पाटणकर नर्सिंग होम येथे अत्यंत अल्प अशा शुल्कात त्यांची प्रसूती होईल हे पाहिले.
- २० वर्षांत २० तज्ज्ञ डॉक्टर्स आणि परिचारिका व तंत्रज्ञ दरमहा येत राहिले. १५० गावांतील ७,००० गरोदर स्त्रियांनी या सुविधेचा लाभ घेतला. पाटणकर नर्सिंग होम हे अन्य इमर्जन्सीसाठी व शस्त्रक्रियेसाठीही आरोग्य शिबिरात येऊन गेलेल्या रुग्णांवर उपचार करीत राहिले.
- डॉ. वैशालीताईंनी काम सुरू केले ते अपत्य होण्या-न होण्या विषयीचे दांपत्यांचे समज-गैरसमज घालवण्यासाठी गावो-गावी घेण्यात आलेल्या त्यांच्या दांपत्य मेळाव्यांपासून! 'मुलगी' होणे, सगळ्या मुलीच असतील तर दुसरा विवाह करून हा प्रश्न सुटेल का? या प्रश्नांवरून त्यांनी तक्ते, माहितीपत्रके, मॉडेल्स, विविध पुस्तके, चित्रे यांच्या साहाय्याने त्यामागील शास्त्रीय तथ्य दांपत्यांना सांगितले.
- ''आम्हांला काय मुले झाली नाहीत?'' ह्या प्रश्नांकडून सर्व ज्येष्ठ भगिनी स्वतः मुली-सुनांना तपासणीसाठी आरोग्य शिबिरात घेऊन यायला लागल्या!

**हा सामाजिक बदल घडवण्याचे शिवधनुष्य त्यांनी पेलले व यज्ञ पूर्ण केला.**

# ❀ समूहगुणविकसन

◈ **किशोर–किशोरी विकास उपक्रम :** या उपक्रमांतर्गत कुसगाव, वर्वे, शिवरे या गावांमधील तीन शाळांमधील १२५ किशोर–किशोरींसाठी काम झाले. विद्याव्रताच्या पूर्वतयारीच्या १८ तासिका घेण्यात आल्या. या तासिकांमधून पंचकोश विकसनावर प्रत्येकी तीन तासिका घेण्यात आल्या. यामध्ये कृती, खेळ, पद्य, चेतना व्यायाम, कोडी सोडवणे, यांद्वारे मुलांना मार्गदर्शन करण्यात आले. तासिकांमधून मार्गदर्शन करण्यासाठी पुण्यातून श्रिया संस्थेतून सात तज्ज्ञ मार्गदर्शक नियमित येत होते. दिनांक १ फेब्रुवारी २०२५ रोजी ११६ मुला–मुलींवर विद्याव्रत संस्कार झाला. मुलांना आशीर्वाद देण्यासाठी व मार्गदर्शन करण्यासाठी निगडी केंद्रातून श्री. शिवराजदादा पिंपुडे आले होते. शिवरे शाळेचे व वर्वे शाळेचे मुख्याध्यापक उपस्थित होते. त्याची पूर्वतयारी एका शिबिरात करून घेतली गेली. यात योग, सूर्यनमस्कार, व्यायाम तसेच निरीक्षण कौशल्य, तर्कशुद्धविचार करण्याचे कौशल्य वाढवणारे खेळ झाले. संवादिनीच्या परिमलाताई पांडे यांनी आपण शाळेत जी प्रतिज्ञा म्हणतो त्याचा अर्थ मुलांना सांगितला. या मुलांच्या पालकांची एक सभा होऊन त्यांना विद्याव्रताची माहिती देण्यात आली. त्याला ५७ पालक उपस्थित होते.

◈ **युवती विकास :** लग्नापूर्वी ज्या युवती नेतृत्वाची संधी घेतात, त्यांची आयुष्यच बदलून जातात... त्यांचा आत्मविश्वास लक्षणीय वाढतो. मग त्या समवयस्क गटात या बदलामुळे उठून दिसतात. यासाठी युवतींच्या प्रशिक्षणाची योजना केली जाते. कामाची संधी मिळेल असे पाहिले जाते. सध्या साधारण २५ युवती त्यांच्याच गावातील मुलांसाठी खेळ (दल) घेतात. काही (१० जणी) कातकरी विकास प्रकल्पात काम करतात, तर निवासातील युवती (१०) निवासातील लहान मुलींसाठी जबाबदारी घेऊन काम करतात. अशा साधारण ४५ युवती नियमित संपर्कात आहेत.

कामाचे नियोजन करणे, तसे करताना येणाऱ्या अडचणी सोडवणे, केलेल्या कामाचे निवेदन लिहिणे, प्रकल्पाच्या कामाचे अहवाल लेखन करणे अशी कामे त्या करतात. अर्थसखी, तंत्रस्नेही अशा प्रकल्पात कामे करतात. क्वचित प्रसंगी गावातील एकशिक्षकी शाळेतील एकुलत्या एका शिक्षकाला बाहेर जावे लागले, तर त्या दिवशी शाळाही चालवतात. मग गावाचे निःसंकोच प्रतिनिधित्व करतात. ग्रामसभेला हजेरी लावतात. तसंच गावात सहल आली तर त्याच गाव प्रतिनिधी बनून यजमानही बनतात. आणि गावात ज्ञान प्रबोधिनीच्या 'प्रबोधिका' बनून स्त्री–शक्ती प्रबोधनाच्या कामाच्या दूत बनतात! असा युवती विकासाचा प्रवास राहिला आहे!

◈ **युवोन्नती प्रकल्प :** हेल्थएज कंपनीच्या अर्थसाहाय्यातून वेल्हे तालुक्यातील युवतींसाठी युवोन्नती प्रकल्प घेण्यात आला. या प्रकल्पात आठ गावांतील २० युवतींचा सहभाग होता. युवतींची निवड करण्यासाठी इच्छुक युवतींचा एक मेळावा घेण्यात आला. याला ३० जणी आल्या. त्यांच्यासाठी स्व–ओळख, संवाद कौशल्य, नियोजन कौशल्य, नेतृत्व म्हणजे काय, लवचिकता, पुढाकार घेणे, प्रतिसादी असणे, मुलाखत कौशल्य, गटकार्य, हस्तकौशल्य, आर्थिक साक्षरता अशी ११ सत्रे घेण्यात आली. प्रत्येक युवतीला सहा संधी देण्यात आल्या : आषाढी वारीमध्ये सहभाग, सामाजिक रक्षाबंधन – सैनिकांना प्रत्यक्ष भेटून त्यांना राखी बांधणे, आपल्या गावातील छोट्या मुलांचे मैदानी खेळ घेणे (दल), शिबिराचे नियोजन करणे, शाळेतील ८वी –९वीच्या मुलांचे तास घेणे, कंपनी भेट – (हेल्थएज कंपनी)

◈ **तंत्रस्नेही प्रकल्प :** ग्रामीण युवतींना महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना काही तांत्रिक कौशल्ये शिकवण्याचा उपयोग त्यांना भविष्यातील कामांच्या संधीमध्ये होईल या उद्देशाने युवतींना प्रशिक्षण देण्यात आले. लॅपटॉप हाताळणे, लॅपटॉप वर

### ◆ *जास्वंद गिरिकन्या निवास, वेल्हे : कमवा शिका योजना* ◆

अकरावी व बारावीचा शिक्षणाचा खर्च स्वतः करायचा का? असा विषय मार्च महिन्यात झालेल्या युवती बैठकीत मांडल्यावर, नऊ युवतींनी, ''आम्ही सुट्टीत काम करून स्वतःच्या शिक्षणाचा खर्च स्वतः करू'' असे सांगितले. असे म्हणण्यापाठीमागची दोन कारणे आहेत. एक म्हणजे घरची आर्थिक परिस्थिती ज्यामुळे पुढील शिक्षण थांबेल आणि दुसरे म्हणजे निवासात राहिल्याने मिळालेली प्रेरणा. काम करू असे सांगितले नऊ युवतींनी पण प्रत्यक्षात सात जणी शाळेला सुट्टी लागल्यानंतर ठरल्याप्रमाणे दहा दिवसांनी १९ एप्रिलला निवासात हजर झाल्या. आणि २० एप्रिलपासून कामाला सुरुवात झाली. असे दोन महिने २० जूनपर्यंत कामाचे नियोजन केले आहे. आत्तापर्यंत नियोजन व निवेदनाच्या चार बैठका झाल्या. एकीकडे काम आणि एकीकडे शिक्षण असे दोन्ही सुरू आहे. उदा. सर्वेक्षण करायचे म्हणजे काय करायचे? ते कसे करायचे? एखादा उद्योग करायचा असेल तर त्याच्या लेखी नोंदी, फायदा तोटा कसा बघायचा? फोटो काढताना तो कसा काढावा? अशी काही प्रशिक्षणे या मुलींसाठी होत आहेत. यातील सहा मुलींनी संगणक वर्गाला प्रवेश घेतला आहे.

व्हिडिओ दाखवणे, यू-ट्यूब लिंक वरून व्हिडिओ डाऊनलोड करणे, क्यूआर कोड स्कॅन करणे, gmail अकाऊंट मधून गूगल ड्राईव्हवर फोटो अपलोड करणे अशी तंत्र शिक्षणाशी संबंधित तर नियोजन, निवेदन, नव्या माहितीची मानसिक तयारी अशी व्यक्तिविकासाशी संबंधित सत्रे झाली.

◈ **हेल्थएज कंपनी भेट** - दि. २८ मे २०२४ या दिवशी युवोन्नती (युवती विकास) प्रकल्पातील युवतींची हेल्थएज कंपनीमध्ये भेट झाली. कंपनीच्या वतीने मुलींसाठी वेगवेगळ्या सत्रांचे आयोजन केले होते. तेथील अधिकारी श्री. विकास अगरवाल, श्राव्या इथा मॅडम, उजाला सभ्रवाल तसेच कार्तिकसर यांनी मुलींना प्रभावी चांगल्या सवयी, सातत्याने शिकण्याची तयारी, वेळेचे नियोजन या विषयी मार्गदर्शन केले.

◈ **सामाजिक रक्षाबंधन - सैनिकांना राखी बांधणे :-** रक्षाबंधनाच्या दिवशी दापोडी येथे कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग येथे तेथील मुख्य अधिकारी मा. अभिमन्यू आठले यांच्या मदतीने सैनिक बांधवांसोबत रक्षाबंधन उत्सव साजरा केला. युवोन्नती प्रकल्पातील सात युवती व एक कार्यकर्ती अशा आठ जणींनी प्रत्यक्ष जाऊन सैनिक बांधवांना राखी बांधली. कार्यक्रमात सहभागी आठ जणींसाठी अतिशय अभिमानास्पद व आनंददायी असे अविस्मरणीय रक्षाबंधन साजरे करण्यात आले.

◈ **दल -** युवोन्नती प्रकल्पांतर्गत ऑगस्ट २०२४ ते फेब्रुवारी २०२५ या कालावधीत ११ ठिकाणी १५ दले घेण्यात आली. यात मुलांसाठी संध्याकाळच्या वेळेला खेळ आणि व्यायाम घेतले जातात. इ. ४थी ते ७वीच्या एकूण ३१४ मुला- मुलींचा सहभाग या दलांमध्ये होता. युवोन्नती मधील एकूण १६ युवतींनी ही दले घेण्यामध्ये सहभाग घेतला.

◈ **शिष्यवृत्ती :** दरवर्षी दोन प्रकारच्या शिष्यवृत्या दिल्या जातात . एक प्रकार म्हणजे 'कमवा आणि शिका' योजने अंतर्गत, ज्यांना सुट्यांमध्ये काम करून शिकण्याची संधी घ्यायची आहे अशांसाठी तर दुसरा प्रकार गरजू विद्यार्थी योजना. या वर्षी आपण ३१ जणांना रु. २,५०,५८०/- शिष्यवृत्ती दिली.

# नेतृत्व

★ **नवदिशा नेतृत्व प्रकल्प**

ग्रामीण भागातील महिलांमध्ये आत्मविश्वास यावा, कौशल्य विकसनातून आणि चांगल्या गोष्टींनी स्वतःचे व्यक्तिमत्त्व नेमके करत जाण्याच्या त्यांच्या प्रयत्नातून त्यांनी हळूहळू स्वतःच्या घराचे, कुटुंबाचे आणि गावाचे नेतृत्व करण्यात पुढाकार घ्यायला लागावे यासाठी नवदिशा नेतृत्व प्रकल्प चालू आहे.

◆ **गावासाठी काही करण्याची संधी :** या महिलांना स्पर्धा परीक्षा देणाऱ्या उद्याच्या अधिकाऱ्यांसमोर गावातील प्रश्नांवर चर्चा करण्याची संधी दिली गेली. एकूण २१ गावांतील ३६८ जणी तिळगूळ मेळाव्यांसाठी जमल्या. या निमित्ताने महिलांचे एकत्रीकरण करणे, तिळगूळ समारंभ नियोजित करणे याचे प्रशिक्षण झाले.

स्पर्धा परीक्षा विभागातील ३२ विद्यार्थ्यांनी गावांमधील प्रश्नांवर सर्वेक्षण केले. यात आठ महिलांनी मदत केली. त्यांना त्यानिमित्ताने अनेक गावांतील महत्त्वाचे प्रश्न प्रत्यक्ष समजले.

गावातील रस्ते, पाणी आणि आरोग्य सुविधांचा अभाव, दारूचा प्रश्न, शाळेत जाणाऱ्या मुलांसाठी दळण-वळणाची सोय, पिण्याचे पाणी दूषित असल्याने प्रश्न, बेरोजगारी, शहराकडे तरुणांचा ओढा, महिलांसाठी काहीतरी उद्योग असण्याची गरज, असे अनेक प्रश्न या नवदिशा प्रकल्पातील महिलांनी चर्चेला घेतले.

आलेल्या स्पर्धा परीक्षा विभागाच्या ३२ विद्यार्थांसाठी राहणे आणि जेवण अशी दोन दिवसांची व्यवस्था करून आठ जणींनी १६००/- रुपयांची कमाई देखील केली.

◆ **अभ्यास सहल :** नवदिशा प्रकल्पातील १६ जणी सोलापूर येथील ज्ञान प्रबोधिनीच्या कामाला भेट देऊन आल्या. तेथील बिडी कामगार महिलांसाठी पर्यायी रोजगाराचा पिशव्या शिवण्याचा उद्योग त्यांनी पाहिला. सोलापूर मधील प्रबोधिनीचे काम समजून घेतले.

◆ **उद्योगास भेट :** विविध खाद्यपदार्थ व वाळवणं बनवणाऱ्या शिवापूर येथील उद्योगांना नवदिशा प्रकल्पातील महिलांनी भेट दिली. मोठ्या प्रमाणावर नाचणी पापड, कुरडया, सांडगे, साबुदाण्याची चकली आणि डिंकाचे लाडू कसे बनवतात हे त्यांनी पहिले. स्वच्छता, पदार्थाची गुणवत्ता, पदार्थ बनवताना मोजून घेण्याचे प्रमाण, विक्री कौशल्य, गिऱ्हाईक कसे सांभाळावे अशा अनेक गोष्टींची त्यांना कल्पना आली.

★ **विविध कार्यक्रमांना उपस्थित राहण्याची संधी -**

आठ जणींनी गावातील विविध प्रश्नांवरील सर्वेक्षण आणि त्यामध्ये गावकऱ्यांनी मांडलेल्या विविध प्रश्नांचे सर्वेक्षण करण्याची संधी घेतली. २२ महिलांनी २२ गावांमध्ये तिळगूळ मेळावा योजण्याची संधी घेतली. ग्रामीण महिलांच्या ३० वर्षे झालेल्या कामावरील एका पुस्तकाच्या प्रकाशन समारंभासाठी ८ जणी उपस्थित होत्या.

★ **नवरात्र मेळावे**

४६ गावांतील १३७४ महिलांसाठी नवरात्र मेळावे झाले. त्यातील ३५ गावांतील ८१४ जणींची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली आहे.

# ❀ उपेक्षितांचा विकास

★ **जास्वंद गिरिकन्या निवास**

◈ **अभ्यासातील यश :** यंदाचे निवासाचे ११वे वर्ष. ५वी ते १०वीच्या २५ मुली निवासात आहेत. सर्वच विद्यार्थिनींनी उत्तम गुण मिळवले. पैकी १०वीच्या विद्यार्थिनींना, प्रणाली शिळीमकर ८४%, श्रेया जोरकर ७९%, प्रतीक्षा वाघमारे ७८%, तर दीपाली कचरे हिला ६६% मिळाले.

◈ **हिमोग्लोबिन तपासणी :** निवासातील २५ मुलींची हिमोग्लोबिन तपासणी झाली. तीन जणींना हिमोग्लोबिन वाढवण्याची गरज होती. त्यांना गोळ्या देण्यात आल्या.

◈ **अभ्यासेतर, अभ्यास पूरक आणि व्यक्तिमत्त्वाच्या घडणीचे उपक्रम :** उत्तम अभ्यासासोबत ‘शनिवार शाळा’ या सर्वंकष विकासाच्या कार्यक्रमाद्वारे वर्षभरात पुढील गोष्टी घडल्या :-

➢ गानवर्धन या पुण्याच्या प्रथितयश संस्थेद्वारे गेल्या तीन वर्षांपासून संवादिनी (हार्मोनियम) वादन आणि गायन यांचे शास्त्रोक्त शिक्षण दिले जाते. तीन वर्षांत २५ जणींनी संवादिनीची पहिली परीक्षा दिली व यश मिळवले.

➢ **विक्री कौशल्य :** दरवर्षीप्रमाणे यंदाही निवासातील ८वीच्या दहा मुलींनी वेल्हे यात्रेमध्ये पाणीपुरीचे दोन स्टॉल लावले. साहित्याची यादी, खरेदी आणि नोंदी करणे, ग्राहकांशी बोलून बनवून देणे, त्यांचा हिशोब करणे हे शिकत मुलींनी १२५६ रु. नफा मिळवला. दुसऱ्या गटाने भेळ, मसाले, पापड विकून रु. ७६० मिळवले.

➢ **स्पोकन इंग्लिश** : २९ दूरस्थ तासिकांद्वारा मुली स्पोकन इंग्लिशच्या दोन गटांमध्ये व्याकरण, प्रश्न पत्रिका सोडवणे, कविता, ऋतूंवर निबंध लेखन व स्वत:ची ओळख करायला शिकल्या.

➢ **ओळख स्पर्शाची :** ५वी ते ८वीच्या गटाला वेगवेगळे बसवून चांगल्या व वाईट स्पर्शाची ओळख हे सत्र झाले. तर मासिक पाळीविषयी बोलणे झाले.

➢ **सहल :** प्रभाताई इनामदार यांनी मुलींना पुण्यातील गणेश पेठेत गुरुद्वारा दाखवून गुरु ग्रंथसाहेबची ओळख आणि शीख गुरूंचा इतिहास सांगितला. राजा दिनकर केळकर संग्रहालय आणि संभाजी नगर येथे उद्यानात मस्त्यालय पाहून संभाजीउद्यान ते स्वारगेट मेट्रो प्रवास पहिल्यांदाच केला.

➢ **विशेष उपक्रम :** आषाढी एकादशी निमित्त गावकऱ्यांसमोर अभंग गायन, गणेशोत्सवात बरची नृत्य सादरीकरण, नवरात्रात मेंगाई देवीसमोर गाण्यांचे सादरीकरण, शिवजयंतीनिमित्त चल बर्ची नृत्यात सहभाग अशी संधी या वर्षी मुलींनी घेतली.

➢ **नीलांबर हिल रन मॅरेथॉन :** निवासातील ५वी ते १०वीच्या १० मुली नीलांबर हिल रन स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. त्यापैकी ५ किलोमीटर व १० किलोमीटर धावणाऱ्यांच्या स्पर्धेत तीन मुलींनी पारितोषिक मिळवले. द्वितीय क्रमांक उज्ज्वला महाडिक, तृतीय क्रमांक विभागून दिपाली कचरे व कोमल खुळे या दोघींना मिळाला.

➢ **प्रात्यक्षिके :** १२ जानेवारीला किशोरी विकास प्रकल्पांतर्गत प्रात्यक्षिकांमध्ये निवासातील १२ मुलींनी योगासने संगीतावर बसवली होती.

➢ **शिवजयंती :** दोन्ही निवासांतील मुलींनी या वर्षी प्रथमच शिवजयंती उत्सवात चल बर्ची नृत्यात सहभाग घेतला.

★ **नवदृष्टी गिरिकन्या निवास**

माध्यमिक शाळेचे शिक्षण गावाबाहेर रोज ८-१० कि.मी. चालत जाऊन घ्यावे लागत असल्याने अनेक मुलींची शाळा आठवी इयत्तेतच संपते. मुलींना शिक्षण पूर्ण करता यावे आणि त्यांचे लग्नाचे वय १८ वर्षे वयाच्या पुढे जावे यासाठी आपण मुलींचे निवास सुरू केले. यात मुली राहतात आणि वेगवेगळ्या शाळा महाविद्यालयांमध्ये जाऊन शिकतात. एक मोठी संधी त्यांच्यासाठी उपलब्ध होते. या वर्षी पूर्वी एकत्र असणारे निवास दोन भागात केले गेले आणि युवतींसाठीचे ‘नवदृष्टी’ हे निवास वेगळ्या ठिकाणी सुरू झाले. त्यात झालेले काम पुढीलप्रमाणे :-

➢ युवतींनी कामात समायोजन करण्यासाठी वर्षभरात ४ बैठका घेतल्या. यात कामातील अडचणी आणि आढावा झाला. सर्व युवतींची आरोग्य तपासणी होऊन ज्यांचे हिमोग्लोबिन कमी आहे अशा दोघींसाठी विशेष काळजी घेतली.

➢ युवतींच्या व्यक्तिमत्त्व विकसनासाठी निरीक्षण, संवाद, नियोजन, स्मरण ही कौशल्ये, संविधानाविषयीची जाणीव-जागृती, ध्येय निश्चिती, करिअर गायडन्स असे विषय चर्चा करून, मुलींनी सुचवले होते त्यावर वर्षभरात १५ सत्रे झाली. त्याचबरोबर ज्येष्ठांचे अनुभव आणि एका फिल्मचाही आस्वाद मुलींनी घेतला.

➢ **विशेष उपक्रम :** गणेशोत्सवात वेल्हे येथील मेंगाई गणेश मंडळा समोर बर्ची नृत्य आणि ढोल पथक सादर करण्याची संधी २३ मुली आणि ११ युवतींना मिळाली. तर शिवजयंती उत्सवात गावात प्रथमच चल बर्ची नृत्याचा प्रकार सादर केला गेला. डॉल्बीवर नाचण्यापेक्षा स्वतः असे सादरीकरण करण्याचे एक चांगले उदाहरण प्रथमच वेल्हेकरांसमोर सादर झाले.

## ★ एकल महिला

वेल्हे तालुक्यातील एकल महिलांसाठी आपण गेली १० वर्षांहून अधिक काळ काम करीत आहोत. कागदपत्रपूर्ततेसाठी मदत हे मुख्य काम या वर्षी झाले. यात ११ महिलांसाठी संजय गांधी योजनेचे काम पूर्ण केले. श्रावणबाळ योजना व रेशन कार्डासंदर्भातील १२  कामे झाली.  सात गृहभेटी झाल्या, तर ३५ जणींची संपूर्ण माहिती आपल्याजवळ जमा झाली. ज्ञान प्रबोधिनी फौंडेशनच्या मदतीने या वर्षी आपण नऊ महिलांना मिळून १,६५,०००/- रुपयांचे खेळते भांडवल दिले, जे शेळी पालन आणि अन्य उद्योगांसाठी वापरले गेले.

पासली येथे २८ एकल महिलांचा मेळावा घेण्यात आला. दिवाळीचा फराळ वाटप झाले.

## ★ कातकरी विकास प्रकल्प

➢ **शिक्षण :** वेल्हे तालुक्यात एकूण ३५ कातकरी वस्त्या आ-हेत. त्यातील १५ वस्त्यांवर आपले काम आहे. शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि शासकीय कागदपत्रांची पूर्तता अशा विषयांवर काम चालू आहे. पैकी आठ कातकरी वस्त्यांवर शिक्षणाचे काम चालू आहे. त्यातून ५ ते १५ वयोगटातील १ली  ते ७वी तील  १२९ मुले-मुली नित्य शिक्षणाची सत्रे यांचा लाभ घेत आहेत. यात अभ्यास, खेळ, चां-गल्या सवयी आणि कलाकौशल्य असे विषय चालू आहेत. पालकांना शिक्षणाचे महत्त्व समजावे म्हणून त्यांच्या दोन बैठका घेण्यात आल्या. पालकांसोबत झालेल्या बोलण्याचा परिणाम म्हणून पालकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन नऊ कातकरी आणि चार धनगर मुलांना पालकांसह शाळेत नेऊन त्यांचे प्रवेश निश्चित केले.

१) **विविध मेळावे :** कौशल्य मेळावे, दिवाळी गंमत-खेळ मेळावा आणि विज्ञान शिबिर यांमधून एकूण २१७ मुलांनी सहभाग घेतला आणि अनुक्रमे कौशल्य सत्रे, स्वच्छतेचे महत्त्व, 'चेत्या' ही फिल्म पाहणे, गंमत- खेळ आणि आकाशकंदील बनवणे, पथनाट्य, स्मरण कौशल्य, विज्ञान प्रयोग आणि सायंकालीन खेळ यांचा मुलांनी लाभ घेतला.

२) **सहल :** ४० मुले आणि दहा ताई यांची नायगाव येथील सावित्रीबाई फुले यांच्या घराला तसेच बालाजी मंदिराला सहल गेली होती.

➢ **रोजगार :** विविध कौशल्ये युवतींनी शिकावी आणि त्याचा उपयोग रोजगार निर्मितीसाठी करावा याकरिता कौशल्य सत्रे झाली. यासाठी सहा वस्त्यांवर जाणीव-जागृती सत्रे झाली आणि नंतर एकूण तीन वर्ग झाले.

१) **पार्लर वर्ग :** चार वस्त्यांतील १४ मुलींचा सहा दिवसांचा पार्लर वर्ग झाला. यात साड्यांचे आणि केशरचनेचे विविध प्रकार शिकवले. चार वस्त्यांतील नऊ मुलींसाठी तीन दिवसांचा मेंदी वर्ग झाला. चार वस्त्यांतील सात मुलींचा पाच दिवसांचा शिवणवर्ग झाला. यात प्राथमिक शिवण म्हणजे हुक-लुक, बटण, टीप मारणे आणि कटिंग करणे शिकवले. तर आठ जणी पाच प्रकारचे भरतकामाचे टाके शिकल्या.

२) **जांभूळ विक्री :** गेल्या वर्षी आपण गावातील जांभळे प्लास्टिकच्या डब्यात पॅक करून विकली. त्याला चांगला प्रतिसाद आला. त्यामुळे याही वर्षी हे काम केले. सात कुटुंबांनी २५१ किलो जांभळे विकून त्यातून ३८,२००/- रुपयांची उलाढाल झाली.

३) **उद्योग पाहण्यासाठी सहल :** खोपडेवाडी येथील खेकडे-पालन करणारे बापू जोरकर आणि निगडे येथील मत्स्यपालन करणारे शिवाजी बावळेकर यांच्या कामाला सहा युवकांनी भेट देऊन हे काम समजून घेतले.

## ★ आरोग्य

१) **जाणीव-जागृती :** स्वच्छतेचे महत्त्व सांगणारी जाणीव-जागृती सत्रे आणि सहा वस्त्यांवर श्रमदानाने संपूर्ण वस्तीची स्वच्छता असे कार्यक्रम झाले.

२) **सकस आहार प्रकल्प :** चेलाडी वस्तीवर ८३ मुलांसाठी १०० दिवसांचा सकस आहार प्रकल्प झाला. त्यातील फायदा लक्षात आल्यावर ४० पालकांसाठी आहार कसा बनवायचा असे एक सत्र झाले. त्या-त्या भागात उपलब्ध भाज्या आणि फळांच्या विषयी माहिती पालकांना सांगितली.

३) **आरोग्य तपासणी :** स्नेहसेवा/मैत्र्येय ट्रस्ट यांच्या मदतीने ५१ महिला आणि ४३ बालकांची आरोग्य तपासणी केली. मुकुंद संगमनेरकर ट्रस्टच्या राधा संगमनेरकर आल्या होत्या.

➢ **शासकीय कागदपत्रे आणि योजना :** ३८ वस्त्यांवरील २२९ कातकरी + ३७ शासकीय अधिकारी + प्रबोधिनीचे २२ कार्यकर्ते अशा २८८ जणांच्या उपस्थितीत पुढील कामे झाली :-

आधार कार्ड लिंक करणे १४ + रेशनकार्ड दुरुस्ती ३७ + वीज जोडणी ४९ + नळ जोडणी १३ + आरोग्य तपासणी ७२ अशा १८५ जणांनी लाभ घेतला. ६ सप्टेंबर रोजी १७९ जणांची जात पडताळणी पूर्ण झाली.

# ❁ विस्तार

◈ **हिरकणी प्रकल्प :** २०१२ ला सुरू झालेल्या या माता प्रशिक्षण प्रकल्पात आजवर २०१३ मातांना (ज्यांची मुले ० ते ६ वयोगटातील अशा) मुलांच्या विकासात सक्रिय सहभाग कसा घ्यायचा याचे प्रशिक्षण दिले गेले आहे. दरमहा दोन सत्रे अशी तीन महिन्यांत मिळून सहा सत्रे घेतली जातात. वेगवेगळे छोटे खेळ आणि कृती मुलांकडून करून घेतल्यास मुलांचा स्नायूविकास, इंद्रियविकास आणि कारक कौशल्यास पूरक वातावरण कसे निर्माण करायचे याचे प्रात्यक्षिक व प्रशिक्षण या सत्रांमधून असते. आजवर हिरकणी सत्र घेण्यासाठी १८ कार्यकर्त्या वेगवेगळ्या गावांतून तयार झाल्या आहेत.

◈ **विस्तार : हिरकणी द्वारे कामाचा विस्तार :** हा विषय गरजेचा असल्यामुळे या प्रकल्पामध्ये विस्ताराची बीजे दिसली आणि गेल्या वर्षीपासून त्याद्वारे विस्तारास सुरुवात केली. त्यासाठी स्थानिक मनुष्यबळ निर्माण व्हावे म्हणून सहभागी प्रशिक्षणार्थींमधून ज्यांच्यात क्षमता आणि ज्यांची इच्छा आहे अशांचे प्रशिक्षक-प्रशिक्षण वर्ग माता प्रशिक्षण वर्गानंतर घेण्यात आले. अशा पाच ठिकाणांहून एकूण ३३ प्रशिक्षिकांनी ३१ ठिकाणी ९१५ माता पालिकांसाठी सत्रे घेतली. विस्तारासाठी आठ जणींचा गट ठिकठिकाणी जाऊन प्रशिक्षक प्रशिक्षणे घेण्यासाठी तयार झाला आहे. तसेच प्रत्यक्ष माता प्रशिक्षणे घेत आहे. सोलापूर, बदलापूर, हराळी, शिक्रापूर अशा चार ठिकाणी एकूण १२ प्रशिक्षक प्रशिक्षणे झाली आणि त्यात ३६ प्रशिक्षिकांनी प्रशिक्षण घेतले. यातील शिक्रापूर येथे सर्वात जास्ती संख्येने म्हणजे दहा प्रशिक्षक तयार झाले आहेत.

ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागातील मातेला तिच्याकडे उपलब्ध असणाऱ्या गोष्टींमधून तिच्या पाल्याच्या विकसनात सहभागी होण्याची कल्पना सारखीच महत्त्वाची वाटते आहे.

◈ **प्रशिक्षक-प्रशिक्षण :** ४ व ५ मे २५ रोजी हिरकणी प्रशिक्षक-प्रशिक्षण शिबिर वेल्हे येथे झाले. त्यात सोलापूर, शिक्रापूर, साळुंब्रे, शिवापूर, वेल्हा येथून एकूण ३२ जणींचा गट सहभागी झाला होता. या शिबिराचा मुख्य हेतू सर्व कार्यकर्त्यांनी एकसारखेच प्रशिक्षण घ्यावे असा होता. उपासना, चर्चासत्र, वेगवेगळ्या खेळाच्या माध्यमातून गटकार्य, कौतुक सोहळा व प्रमाणपत्र वाटप असे या शिबिराचे स्वरूप होते.

| क्र. | केंद्र | प्रशिक्षक संख्या | ठिकाण | सहभागी माता |
|---|---|---|---|---|
| १. | भोर | ३ | ९ | १०० |
| २. | सोलापूर | १० | ७ | ९० |
| ३. | हराळी | ३ | ५ | ५३५ |
| ४. | शिक्रापूर | ७ | ६ | १३५ |
| ५. | मुळशी | ८ | ४ | ५५ |
| | **एकूण** | **३३** | **३१** | **९१५** |

◈ **नवी उमेद :** १८ ते ३५ वयोगटातील व्यक्तींना कागदपत्रांचे महत्त्व समजावे, लग्नाचे प्रमाणपत्र, आधार, रेशनकार्ड, पॅनकार्ड, बँकेचे खाते अशा गोष्टींवर सासरचे नाव लावून घेणे महत्त्वाचे असते. या गोष्टीविषयी जाणीव-जागृती करणे हे नवी उमेद प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे. स्वतःच्या लग्नाचे प्रमाणपत्र मिळवण्यापासून काहींनी कामाला सुरुवात केली आणि महत्त्वाचा पुरावा म्हणून याचा उपयोग होतो असा अनुभव घेतला. अनेकींना लाडकी बहीण योजनेसाठी याचा फायदा झाला. भोर तालुक्यात नवी उमेदची कामे झाली. हराळी येथे प्रशिक्षक-प्रशिक्षण झाले आहे आणि आता प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल. यात प्रथम प्रत्येकीचा एक फॉर्म भरून घेतला जातो आणि त्यातील तपशिलांच्या आधारे जिथे आणि जशी गरज असेल तसे काम होते. कार्ड काढणे, नाव बदलणे, बँकेत खाती काढणे अशी कामे होत आहेत.

# ❁ पाहुणे भेटी

- या वर्षी ज्ञान प्रबोधिनीतील स्पर्धा परीक्षा केंद्राचे (४२), पुणे प्रशालेचे (४२ मुली, ३९ मुले) व निगडी (३३०) अशा विद्यार्थ्यांनी भेट दिली.
- आर. के. फौंडेशन या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी भेट दिली व काही मदत केली.
- सिंहगड आर्किटेक्चर कॉलेजच्या ४० विद्यार्थ्यांचे राष्ट्रीय सेवा योजनेचे (NSS) शिबिर आडवली गावात झाले.

## ❀ एका दृष्टीक्षेपात महत्त्वाचे प्रकल्प

| क्र. | प्रकल्पाचे नाव | सहभाग | परिणाम /उलाढाल |
|---|---|---|---|
| **प्रमुख : भारती खासबागे, मंगल तुपे** | | | |
| १. | स्वाधार प्रकल्प | ९ गावांतील २०० पेक्षा जास्त महिला आणि पुरुष | उपजीविके साठी कौशल्य प्रशिक्षणे, जैव विविधतेवर काम |
| २. | हरित ऊर्जा प्रकल्प | ३ गावे ४४ शेतकरी, १५ महिला बचत गट सदस्यांचे व्यवस्थापन | ४४ एकरांवर ऊर्जा शेती/२० टन इंधन कांडी उत्पादन |
| ३. | सायबेज संपदा प्रकल्प | १५ गावे : ३७ कौशल्य प्रशिक्षणांत २६७ महिला सहभागी | ४४ stall वर विक्री करून १० जणींची वार्षिक उलाढाल ३.५० लक्ष झाली. ६२ जणींनी महिना १०,०००/- उत्पादन कमावले |
| ४. | धनश्री प्रकल्प | ५ केंद्रांवर २३ कौशल्य प्रशिक्षण वर्गांमधून २४२ जणी सहभागी | उत्पादन करण्यास सुरुवात |
| ५. | स्वयंरोजगार पुणे | ---- | ---- |
| ६. | अन्नपूर्णा प्रकल्प | ५ गावांत स्वयंरोजगार प्रशिक्षणे | |
| **प्रमुख : तृप्ती कुलकर्णी** | | | |
| १. | हिरकणी | आजवर १२ वर्षांत २०१३ मातांचे प्रशिक्षण | प्रबोधिनीच्या विस्तारासाठी हिरकणी प्रकल्पाची योजना. भोर, सोलापूर, शिक्रापूर, हराळी, मुळशी अशा ५ ठिकाणी एकूण ३३ प्रशिक्षकांनी ३१ ठिकाणी ९५१ मातांचे प्रशिक्षण केले |
| २. | नवी उमेद | १७ गावांतून ३०० फॉर्म | ३० महिलांचे विविध जाणीव-जागृती |
| ३. | आरोग्य सखी प्रकल्प | वेल्हे, भोर आणि हवेली या तीन तालुक्यांत एकूण १६० गावांतून १८६ आरोग्य कॅम्प झाले. १६२० जणांची (८ प्रकारची ) तपासणी झाली. तसेच ८० लोकांचा तपासणी नंतरच्या उपचारांसाठी पाठपुरावा करण्यात आला. | आरोग्यासंदर्भात जाणीव-जागृती मोठ्या प्रमाणावर होत आहे. |
| ४. | ज्वाला प्रकल्प | १५० पर्यावरणास अनुकूल चुली कुटुंबांमधून आंघोळीचे पाणी तापवण्या करिता वापरात. प्रत्येक कुटुंब सरासरी ४ टन वर्षाला स्वैपाकासाठी आणि ४ टन अंघोळीचे पाणी तापवण्यासाठी वापरतात | १५० कुटुंबांचे प्रत्येकी ४ टन लाकूड वर्षाला वाचले. एकूण ६०० टन लाकूडतोड वाचली आहे. |
| ५. | विस्तार | भोर, सोलापूर, हराळी, शिक्रापूर, मुळशी या ५ ठिकाणच्या ३३ प्रशिक्षकांद्वारे ३१ ठिकाणी ९१५ माता सहभागी. | भोर, सोलापूर, हराळी, शिक्रापूर, मुळशी |
| **प्रमुख : आशा सुर्वे** | | | |
| १. | बचत गट | ६६ गावांमधील १२५ बचत गट १९२० सभासद | १,३२,६९,०४४ /- रुपये बचत<br>४,०१,३०,३५३/- रुपये अर्थसाहाय्य<br>५७,७८,८८८/- रुपये व्याज! |
| २. | नवदिशा नेतृत्व प्रकल्प | २५ गावांतील २५ जणींसाठी नेतृत्व प्रकल्प | २५ जणींमार्फत गावातील ७५ जणींसाठी एकल महिलांसाठी काम, नवरात्र मेळावे |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | एकल महिला | आजवर ३ तालुक्यांतील ४५० एकल महिलांची नोंदणी झाली. १८६ जणींकरिता काम झाले आहे. (१५०० रुपये दरमहा असे त्यांच्या खात्यात पडतात. आजवर साधारण १ कोटी रुपये स्थानिक महिलांच्या खात्यात जमा) | |
| ४. | खेळते भांडवल | ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन, अमेरिका यांच्या मदतीने गेली ५ वर्षे आपण छोटी कर्जे देत आहोत. ही विशिष्ट कालावधीत परतफेड करण्याची कर्जे घेऊन आजवर ५ वर्षांत १९२ महिलांनी तर या वृत्त काळात ५२ महिलांनी आपले उत्पादन जवळजवळ दुप्पट करून घराला आधार दिला आहे. २४ गावांमधील ३९ महिलांनी एकूण ५,९९,५००/- रुपयांची कर्जे घेतली. | अत्यंत गरजू महिलांना घरासाठी काहीतरी उत्पादन करून स्वतःचा वाटा उचलण्याची संधी मिळाली. |
| **प्रमुख : अश्विनी ठाकर** | | | |
| १. | आंबवणे प्रशिक्षण केंद्र | ---- | ---- |
| २. | किशोर- किशोरी विकास | ३ शाळांमधील १२५ किशोर - किशोरी | व्यक्तिमत्त्व विकसन आणि नियोजन करण्यासाठी १२५ जणांसाठी प्रेरणा जागरण |
| 3. | हेल्थएज युवोन्नती प्रकल्प | ८ गावांतील २० युवती | |
| **प्रमुख : रंजिता सरवदे** | | | |
| १. | जास्वंद गिरीकन्या व नवदृष्टी निवास | या वर्षी एकूण २४ गावांमधील ३९ जणींसाठी निवास | वेल्हे तालुक्यातील मुलींना दहा वर्षांपासून शिक्षण पूर्ण करण्याची संधी मिळते आहे. आजवर २० जणी पदवी परीक्षा उत्तीर्ण |
| **प्रमुख : प्रतिभा स्वामी** | | | |
| १. | कातकरी विकास प्रकल्प | १५ कातकरी वस्त्या. शिक्षण, रोजगार, चांगल्या सवयी आणि शासकीय कागदपत्रेपूर्तीसाठी काम, ८ वस्त्यांमधील १२९ मुले शाळेत जात आहेत. | १७९ जणांचे जात पडताळणी काम पूर्ण. आपल्या सहनिवासात ५ विद्यार्थिनी राहून निवासी शिक्षण घेत आहेत. |
| ३. | ज्येष्ठ नागरिक प्रकल्प | ११ गावांतील ८१ ज्येष्ठ नागरिकांसाठी काम | औषधे वेळेवर मिळणे, आवश्यक बँक आणि इतर संबंधित कामे करण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांना मदत मिळू लागली. (प्रमाण अल्प पण सुरुवात झाली) |
| ४. | एकल महिला प्रकल्प | ---- | वेल्हे तालुक्यातील १२६ महिलांच्या खात्यावर आजवर ९६ लक्ष रुपयांहून अधिक रक्कम सरकारी विविध योजनांद्वारे जमा झाली आहे. |
| ५. | शिष्यवृत्ती | ३१ जणींसाठी २,५०,५८०/- रुची शिष्यवृत्ती दिली | |
| ६. | अर्थसखी प्रकल्प | ---- | ---- |

## शिक्षण

❖ **यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ**

ग्रामीण भागातील महिलेचे शिक्षण बऱ्याच कारणांनी अर्धवट राहिलेले असते. ते कालांतराने तिच्या मुलांच्या शिक्षणासोबत जरी तिला करता आले तरी तिने ते पूर्ण करावे असा आग्रह गेली १४ वर्षे आपण लावून धरला. अनेकींनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पदवीपूर्व परीक्षा (१०वी आणि १२वी समकक्ष) देऊन नंतर पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. आजवर २००+ जणींनी १२वी नंतरचे पहिले आणि दुसरे वर्ष (F.Y./ S.Y.) पूर्ण केले आहे. आणि ३५ जणींनी पदवीपर्यंतची परीक्षा दिली आहे व यश मिळवले आहे. एकूण पाच जणांनी पदव्युत्तर परीक्षा दिली आहे (M.A.).

गेल्या दोन वर्षांत एकूण सात जणींनी परीक्षा दिली असून या वर्षी तिघीजणी पदवी परीक्षा देत आहेत. आंगणवाडी ताई आणि आशा वर्कर असलेल्या काही जणींची नावे आता शासनाच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ झाल्याच्या यादीत आली आहेत.

## तांबे संकूल

◆ **उद्घाटन :** गुढीपाडवा ९ एप्रिल २०२४ रोजी 'तांबे संकुलाचे' उद्घाटन झाले. आशीर्वाद देण्याकरिता प्रबोधिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते मा. सुभाषराव देशपांडे या प्रसंगी उपस्थित होते. मा. लीननताई तांबे यांनी दिलेल्या देणगीतून हे संकुल उभारण्यात आले आहे. संकुलात नवदृष्टी मुलींचे सहनिवास सुरू झाले. तसेच संगणक प्रशिक्षणासाठी सुसज्ज संगणक वर्ग हा Lyondellbasell या संस्थेच्या देणगीतून ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन, अमेरिका द्वारे आपल्याला देण्यात आला आहे. या संकुलामुळे महिलांच्या प्रशिक्षणासाठी महत्त्वाची उपलब्धी झाली आहे.

◆ **संगणक वर्ग, वेल्हे :** वेल्हे येथे संगणक वर्ग घेण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाने सज्ज अशी व्यवस्था करण्यासाठी आपल्याला Lyondellbasell या कंपनीने आर्थिक साहाय्य दिले. त्यात आठ संगणक, दोन प्रिंटर, व दूरस्थ शिक्षण घेता येणारा स्क्रीन-कॅमेरा अशी व्यवस्था तयार झाली. संगणक प्रशिक्षणाचे आरंभिक दोन वर्ग झाले, ज्यात १९ मुले व सहा महिला सहभागी झाल्या होत्या.


◆ **बालविकास वर्ग :** तांबे संकुलामध्ये बारा वर्षांच्या आतील वयोगटातील मुलांसाठी बालविकास वर्ग सुरू झाला आहे. वेल्हे आणि जवळच्या वस्तीतील मुले-मुली याचा लाभ घेतात.

◆ **भेटी :** तांबे संकुलास देणगी देणाऱ्या मा. लीननताई तांबे यांचे नातेवाईक, तसेच रोटरी क्लब ऑफ पुणे, शानिवार वाडा यातील काही सदस्य यांच्यासह श्री. चंद्रशेखर देसाई यांनी तांबे संकुलास भेट देऊन तेथील काम पाहिले आणि कार्यकर्त्यांशी चर्चा केली.

### ❖ *न फिटणारी उपकृतता/ समाज ऋण* ❖

या राखी पौर्णिमेला ग्रामीण युवतींनी एक संधी घेतली. रक्षाबंधनाच्या दिवशी दापोडी येथल्या कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग येथे जाऊन सैनिक बांधवांसोबत ग्रामीण युवतींनी रक्षाबंधन उत्सव साजरा केला. सात युवती व एक कार्यकर्ती अशा आठ जणी प्रत्यक्ष राखी बांधण्यासाठी गेल्या होत्या. मुख्य अधिकारी मा. अभिमन्यू आठले यांनी तिथे प्रवेश मिळण्यापासून ते रक्षाबंधन साजरे करण्यासाठी महाविद्यालयाच्या आवारामध्ये सर्व तयारी केली होती. या महाविद्यालयामधील राष्ट्रीय एकात्मता केंद्रामध्ये रक्षाबंधन कार्यक्रम करण्यात आला. मा. आठले यांनी तेथील शिक्षण व कामकाज याविषयी माहिती दिली. त्यानंतर युवतींनी सैनिक अधिकारी व तेथील व्यवस्थापन करणाऱ्या बंधूंना राखी बांधली. अतिशय अभिमानास्पद व आनंददायी असे, अविस्मरणीय असे रक्षाबंधन साजरे झाले. कारण ग्रामीण युवतींनी सेवेत असणाऱ्या अशा गणवेशातल्या सैनिकांशी प्रत्यक्ष बोलणे सुध्दा आयुष्यात पहिल्यांदाच केले. या वर्षी स्त्री-शक्ती प्रबोधन ग्रामीण विभागाच्या कामाला ३० वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने आपण युवती, किशोर-किशोरी व कार्यकर्त्या असे सर्व मिळून ३०० राख्या बनवून त्या वेगवेगळ्या सैन्य दलातील सैनिक बांधव तसेच पोलिसदादांना बांधणार आहोत. आसाम व फिरोजपूर येथेही राख्या सैनिकांपर्यंत पोहोचल्या आहेत.


अशा 'सामाजिक उपकृततेचा संस्कार करणाऱ्या संधीची ही योजना' प्रासंगिक असली तरी कोणीतरी करावी लागते...



कातकरी विकास प्रकल्पातील मुलांची नायगाव येथे सहल



ॲनिमिया निर्मूलन कार्यक्रम आकाशवाणी सोबत


दलातील मुलांचा आषाढी कार्यक्रमात सहभाग


अंबवणे केंद्रात औषधी वनस्पती लागवड


कार्यकर्त्यांची मासिक बैठक



हिरकणी प्रकल्प सत्र


बालविकास उपक्रम


सहनिवासातील मुलींसाठी शनिवार शाळा उपक्रम


किशोर - किशोरी विकास उपक्रम - विद्याव्रत संस्कार




युवतींची Healthege कांपनी भेट



हरित ऊर्जा प्रकल्पात गवताची कुट्टी करताना




स्वाधार प्रकल्प – महिलांची शिवापूर उद्योगाला भेट




माजगाव येथे सोलरवर चालणारे श्रेडिंग मशीनचे उद्घाटन



सायबेज संपदा प्रकल्प – मसाले प्रशिक्षण



हरित ऊर्जा प्रकल्प अभ्यासक्रम पुस्तिका




कार्यकर्त्यांची सायबेज कांपनी भेट



अर्थ सखी प्रकल्प – नोटा ओळखताना युवती



रानभाज्या मेळावा

# ज्ञान प्रबोधिनी

# स्त्री-शक्ती प्रबोधन

५१०, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

दूरभाष क्र. : (०२०) २४२०७०००/१६२

www.jnanaprabodhini.org ssprabodhan@jnanaprabodhini.org